**सं.फौ.ख.क्र. २७३८/२०१६**
**शासन विरुद्ध तुषार**
**निशाणी क्र. ५३ वर पुढे**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.८ यांचा उलटतपास नि.क्र. ६० वरील आदेशान्वये विधिज्ञ श्री. पी. डी. बेंद्रे यांचेमार्फत शपथेवर सुरु -**

**०२.** माझे शिक्षण बी.ई. सीव्हील इंजिनियर पर्यंत झाले आहे. घटनास्थळ पंचनामा झाला त्यावेळी वार कोणता होता मला सांगता येणार नाही. मी सन २०१६ मध्ये शेती करत होतो. मी सध्या लोणी येथे राहतो. मला फिर्यादीने फोन करून बोलावले होते. फिर्यादी माझा मित्र व नातेवाईक आहे. घटनास्थळ पंचनाम्याकरीता जाण्यापुर्वी मी पोलीस ठाण्यात गेलो नाही. पंचनाम्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो नाही. पोलीसांनी माझ्यासमक्ष नकाशा काढला होता. तो नकाशा पेन्सीलने काढला होता. घटनास्थळ इंजिनियअरींग कॉलेजच्या पश्चिमेला ७०० ते ८०० मिटर अंतरावर होते. अंदाजे ते अंतर ३००० फुट असावे. इंजिनिअरींग कॉलेजची जागा अंदाजे किती लांबीची आहे हे मला सांगता येणार नाही. पंचनामा केला तेव्हा रस्ता ३५ फुटाचा होता आणि बाजुला ५ फुटरवी साईडपट्टी होती. पंचनामा लिहिल्यानंतर मी वाचला होता. पंचनाम्यापुर्वी पाऊस झाला होता किंवा नाही हे मला सांगता येणार नाही.

**०३.** पंचनाम्यासाठी मी घटनेच्या दिवशी गेलो होतो. तारीख ०७/०६/२०१६ अशी होती. घटनास्थळी दिशान हुसैन शेख व फिर्यादी, पोलीस देखील होता. पंचनाम्यानंतर मी माझ्या कामाला निघुन गेलो. हे म्हणणे खरे नाही की, मला पंचनाम्याला बोलावल्याचे मी खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केल्याचे मी खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मित्राला मदत व्हावी म्हणुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
सही/-

राहाता.
दिनांक - २१/०७/२०२५

(संतोष र. भरड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायालय क्र.२), राहाता.